0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचां :- १) वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडून दि.०८/११/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०११/जा.९०७ दि.११/११/२०११.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७८/२०११/जा. ९०८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ११/११/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

### अंतरीम आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

दिनांक २८/१०/२०११ रोजी वाशी पोलिस ठाणे येथील वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत फोनद्वारे माहिती मिळाली की, घाटकोपर मुंबई येथून एक ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा बेकायदेशिररित्या रेशनिंगच्या गव्हाची विक्री करण्यास घेवून जात आहे. सदर ट्रक ताब्यात घ्यावयाचा आहे. त्याबाबत कळविल्याने पोलिस उपनिरिक्षक श्री. ऋषीकेश संपत पवळ व त्यांचे पोलिस पथक दोन पंचासह सरकारी वाहनाने सुमारे १७.३५ वा. पोलिस ठाण्याहून रवाना होवून १७:५० वा. वाशी गांव येथे पोहचले.

सदर ठिकाणी दत्त मंदिराजवळ रोडवर वाशी गांव येथे सुमारे १८:०० वाजता बातमीदाराने दिलेल्या माहिती प्रमाणे ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ हा उभा असलेला दिसला. त्यावरील चालकाकडे चौकशी केली असता, त्याने सदरचा ट्रक हा प्रदिप अग्रवाल याचा असल्याचे सांगून सदरचा रेशनिंगचा गहू घेवून खोपोली येथे जात असल्याचे सांगितले. सदर ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू घाटकोपर येथील लालजी गुप्ता पूर्ण नाव पत्ता माहित नाही यांनी भरला असून जे.के. मिल खोपोली येथे पोहचवण्यांबाबत सांगितले. त्यासाठी खोपोली येथे गेल्यावर संजय नावाच्या इसमास संपर्क साधण्यास लालजी गुप्ता याने सांगितले होते. त्याने त्याच्याकडील चलन सादर केले. सदर चलनावर गणेश ट्रेडिंग कंपनी शॉप नं. ५ बायजाबाई अपार्टमेंट जितेंद्र रोड, मालाड ईस्ट, मुंबई असे लिहिले आहे व सदरचा माल धनश्री ट्रेडिंग कंपनी खोपोली यांच्याकडे देणेबाबत लिहिलेले आहे.

0002 अशाप्रकारे वरील ट्रकमध्ये रेशनिंगचा गहू अवैधरित्या वाहतूक करुन तो खोपोली येथील जे.के. फ्लोअर मिल, धनश्री ट्रेडिंग कंपनी यांना जास्त भावाने स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशिररित्या विक्री करण्यासाठी घेवून जात असताना मिळून आल्याने व त्याबाबत खात्री झाल्याने पंचासमक्ष व ट्रक सहित कामकाज सोईचे जावे म्हणून पोलिस ठाण्यात घेवून आले व सदर मालाबाबत सविस्तर पंचनामा करुन ट्रकसह माल जप्त केला. जप्त ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ व त्यात मिळून आलेले गव्हाची पोती मोजण्याचा प्रयत्न केला. परंतू सदरची पोती ही फुटलेली असल्याने पोत्यांची गणना करणे अशक्य असल्याने सदरचे वाहनासह ARPEE WIEGH BRIDGE सेक्टर १९ वाशी येथे नेवून पंचासमक्ष वजन केले असता, सदर ट्रक व त्यातील मालाचे एकूण १६,२७५ कि.ग्रॅ. असल्याचे दिसून आले. सदर ट्रकमध्ये एकूण अंदाजे २०० पोती प्रत्येकी ५० कि.ग्रॅ. वजनाच्या मुद्देमाल व आरोपींनी सादर केलेले चलन पंचासमक्ष जप्त करुन आरोपीस तपासकामी ताब्यात घेण्यात आले.

दिनांक २९/१०/२०११ रोजी वाशी पोलिस ठाणेचे पोलिस उपनिरिक्षक श्री. पवळ यांनी प्रस्तूत गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ मधील रेशनिंगच्या गव्हाच्या पोत्यांची गणना करण्यासाठी पंचासमक्ष ए.पी.एम.सी. मार्केट येथे हमालांच्या मदतीने ट्रकमधून गव्हाच्या पोती खाली उतरविले व सदर पोत्यांपैकी काही पोती खाकी बारदान्यांची व काही प्लॅस्टिकच्या पांढऱ्या रंगाच्या असून पंचासमक्ष सदर पोत्यांची गणना केली असता एकूण २१८ गव्हाच्या पोती असल्याचे निदर्शनास आले व त्यावर एफ.सी.आय. चा मार्क असल्याचे पथकास निदर्शनास आले. वरील प्रमाणे गणना केल्यानंतर सदर हमालांच्या मदतीने पंचासमक्ष सर्व पोती पुन्हा ट्रकमध्ये भरण्यात आल्या व तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणातील आरोपी लालजी केदारनाथ जैस्वाल यांचा वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे यांच्या समक्ष दि.०२/११/२०११ रोजी नोंदविण्यात आलेल्या जबाबामध्ये लालजी जैस्वाल यांनी नमूद केले आहे की, त्यांच्या ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असून त्यांच्या मालकीचे तीन ट्रक आहेत. तसेच कामराज नगर या ठिकाणी गुप्ता ट्रेडिंग कंपनी या नावाने किराणा मालाचे दुकान आहे. तसेच त्यांच्या पत्नी नामे अनिता जैस्वाल यांच्या नावे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११, गुप्ता जनरल स्टोअर्स, पंतनगर, घाटकोपर असा आहे. सदर दुकानात ग्राहकांसाठी येणारा रेशनिंगचा माल ठेवण्यात जातो व त्याचे वितरण केले जाते. त्यांच्या दुकानात १५०० ग्राहकांना रेशनिंगचे मालाचा पुरवठा केला जातो. साधारण १ महिन्यापूर्वी ग्राहकांना वाटप करण्यासाठी त्यांच्या रेशनिंग दुकानामध्ये २५० पोती गहू आला होता व सदरचा गहू रेशनिंग दुकानात ठेवला होता. रेशनिंगचा गहू प्रदिप अग्रवाल हा जास्त किमंतीने खोपोली येथील विविध मिलमध्ये विकत असतो व तो त्याचा मित्र असल्याने सदरचा गहू खोपोली येथील मिलमध्ये जास्त भावाने विक्री करावयाचा होता, असे सांगितले. त्यानुसार

0003 यांनी प्रदिप अग्रवाल यांना संपर्क साधून सदरचा रेशनिंगचा गहू खोपोली येथील मिलमध्ये पाठविण्यासाठी विनंती केली असता, प्रदिप अग्रवाल याने जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे मॅनेजर श्री. तोमर यांना संपर्क साधून त्यांना रेशनिंगचा गहू पाठवित असल्याचे सांगितले असता, श्री. तोमर यांनी सदरचा गहू पाठवून देण्यास सांगितले. त्यानंतर प्रदिप अग्रवाल यांनी त्यांना संजय या नावाचा फोन नंबर दिला व त्याच्याशी संपर्क साधण्यास सांगून तो सदरचा गहू खोपोली येथे पोहचत करतील व काही अडचणी आल्यास तो पूर्णपणे सांभाळून घेईल असे सांगितले. त्यानुसार लालजी गुप्ता यांनी दि.२८/१०/२०११ रोजी संजय याला फोन करुन रेशनिंगचा गहू घेऊन जाण्यास सांगितले व त्यांच्याकडे असलेला ट्रकचा चालक नसल्याने त्यांनी प्रदिप अग्रवाल यांच्याकडील चालक नामे राकेशकुमार वर्मा यांना संजय याचा फोन नंबर देवून व त्यांच्याशी संपर्क साधून सदरचा ट्रक त्यांच्या रेशनिंग दुकानावर घेवून येण्यास सांगितले. सदरचा ट्रक अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११, गुप्ता जनरल स्टोअर्स, पंतनगर, घाटकोपर या ठिकाणी आल्यानंतर त्यांनी चालकाला ट्रक दुकानासमोर लावून बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर हमालांच्या मदतीने सदर ट्रकमध्ये २१८ रेशनिंगच्या गव्हाच्या पोती भरली व चालक राकेश शर्मा यास गणेश ट्रेडिंग कंपनी, शॉप नं. ५, बायजाबाई अपार्टमेंट, जितेंद्र रोड, मालाड ईस्ट असा पत्ता असलेले टपाल दिले. त्यावर १२० गोणी वजन ५९४० कि.लो. व किंमत रुपये ८०,१९०/- असे निळ्या शाईच्या पेनाने लिहिलेले व त्यावर त्यांनी सही केले असल्याचे सांगितले.

अशाप्रकारे लालजी गुप्ता तसेच संजय यांनी त्यांच्या ताब्यातील बेकायदेशिररित्या बाळगलेला रेशनिंगसाठी पुरवठा केलेला गहू बाळगून तो अवैधरित्या घाटकोपर मुंबई येथून खोपोली येथील जे.के. फ्लोअर मिल, धनश्री ट्रेडिंग कंपनी यांना विक्री करुन तो यातील ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ याचे वरील चालक राकेशकुमार रामादी वर्मा याचे ताब्यात देवून तो घेवून जात असतांना मिळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ९ चा भंग केल्यावरुन वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. ।। ४८/२०११ दि.२८/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ | १ नग | ६,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील २१८ पोती गव्हाचा साठा | १६,२७५ किलो | १,०९,०००/- |
| | | एकूण | ७,०९,०००/- |

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, प्रस्तूत प्रकरणी सुनावणी होऊन सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकुण घेवून अंतिम निकालपत्र देण्यास विलंब लागणार असल्याने व प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गहू हा पदार्थ नाशवंत असल्याने सदरचा पदार्थ आणखी काही काळ तसाच राहील्यास सदरचा गहू खराब होऊन शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे शिधापत्रिकाधारक त्यांचे देय कोटयापासून वंचित राहू नये म्हणून, तसेच शासन निर्णय क्र. ईसीए-१००९/प्र.क्र.३९९/ना.पु.२३, दि. १३ मे, २०१० अन्वये जप्त करण्यात आलेला गहू, तांदूळ, तुरदाळ, साखर व पामतेल या जीवनावश्यक वस्तू, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६ (अ) चे पोट कलम २ मधील तरतूदीनुसार शिधावाटप दुकानदारांना द्यावेत व शिधावाटप दुकानदारांनी सदरच्या वस्तू शासननियंत्रित दराने पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरित करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या गव्हाच्या साठयाबाबत, नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या तपासाच्या तसेच सदर प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्हयाच्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून अंतरीम आदेश पारित करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

**अंतरिम आदेश :-**

१) प्रस्तूत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण २१८ पोत्यामधील एकुण १६,२७५ कि.लो. गव्हाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदर गव्हाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मदतीने त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

४) प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या वरील मुद्देमालाव्यतीरिक्त शिल्लक राहीलेल्या मुद्देमालाबाबतचे आदेश या प्रकरणी सुनावणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर निर्गमित करण्यात येतील.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलिसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ हया लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चा चालक, राकेशकुमार रामादी वर्मा
२) ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ चा मालक, प्रदिप अग्रवाल
३) लालजी केदारनाथ जैस्वाल उर्फ लालजी गुप्ता
४) संजय
५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ चे मालक
६) जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे मालक
७) जे.के. फ्लोअर मिल, खोपोली चे व्यवस्थापक नामे तोमर
८) धनश्री ट्रेडिंग कंपनी, खोपोली चे मालक
९) गणेश ट्रेडिंग कंपनी शॉप नं. ५ बायजाबाई अपार्टमेंट जितेंद्र रोड, मालाड ईस्ट, मुंबई चे मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसाचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होवून गव्हाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील, याची नोंद घ्यावी.
३) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना योग्य त्या कारवाईसाठी अग्रेषित.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.
~~६) निवड नस्ती.~~

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.